स्मरणपत्र - २

# मुंबई विद्यापीठ

दुरध्वनी क्र. ०२२-६८३२ ००५२
०२२-२२६१ ८९८७
Email : supt.statunit@gmail.com

सांख्यिकी कक्ष
खोली क्र २०२, दुसरा मजला,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट,
महात्मा गांधी मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.

**No. UDSTAT/ICD/2019-20/140 of 2020**

दिनांक : २६ फेब्रुवारी, २०२०

**परिपत्रक :-**

विषय : **शैक्षणिक वर्षे २०१९-२० करीता AISHE सर्वेक्षात्मक कार्यक्रमाची माहिती भरणेबाबत.**

संदर्भ : 1. **No. UDSTAT/ICD/2019-20/ 108 of 2020, dated 2nd January, 2020**
2. **UDSTAT/ICD/2019-20/107 of 2020, dated 1st January, 2020**

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून विद्यापीठ विभाग प्रमुख, संलग्नित महाविद्यालये व संस्था यांचे प्राचार्य व संचालक यांच्या निदर्शनास आणून देवू इच्छितो की, **शैक्षणिक वर्षे २०१९-२०** या वर्षाकरीता संचालनालयामार्फत **AISHE (All India Survey on Higher Education)** बाबतची ऑनलाईन माहिती भरण्याविषयी कळविण्यात आलेले होते. परंतु सदर कक्षामार्फत वारंवार पत्रव्यवहार, ईमेल व दुरध्वनी इ. सर्व माध्यमातून संबंधित विषयाबाबत ज्ञात/अवगत केलेले असताना देखील आपल्या विभागाची व संस्थेची संबंधित माहिती अद्यापर्यंत आपल्याकडून सदर कक्षास प्राप्त झालेली नाही.

संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे, यांच्या प्राप्त ईमेलच्या सुचनेनुसार संबंधित माहिती अत्यंत महत्वपुर्ण व गरजेचे असल्याकारणाने ती संचालनालयास त्वरीत सादर करण्याच्या दृष्टीने विद्यापीठ विभागांकरीता विवरणपत्रानुसार आणि महाविद्यालय/संस्था यांच्याकरीता ऑनलाईन स्वरूपी असलेली माहिती भरून सदर कक्षास सादर करून त्याबाबतचे प्रमाणपत्र/हमीपत्र घेणे अनिवार्य आहे.

संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे, यांनी आपल्यामार्फत **AISHE माहिती सादर न केल्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे,** त्या अनुषंगाने आपला विभाग व संस्थेतील आपण प्रमुख या नात्याने वैयक्तिक लक्ष देवून ती त्वरीत विनाविलंब व कोणतीही सबब न दाखविता **शनिवार, दिनांक २९ फेब्रुवारी, २०२०** रोजी कक्षास सादर करण्यात यावी, जेणेकरून संचालनालयास पुढील कार्यालयीन कार्यवाही करण्यास उचित होईल, याची आपण गांभिर्याने नोंद घ्यावी.

नोडल अधिकारी,
**(AISHE/MIS Cell)**

प्रत :-

मुंबई विद्यापीठतील सर्व विभाग प्रमुख व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये, स्वायत्तता महाविद्यालये व संस्था यांचे प्राचार्य व संस्था प्रमुख यांच्या पुढील योग्य त्या कार्यालयीन कार्यवाहीसाठी व माहितीसाठी अग्रेषित.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता रवाना :-**

१. संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण,मध्यवर्ती इमारत पुणे-४११ ००१, यांच्या माहितीस्तव सादर.
२. परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०९८.
३. उपकुलसचिव, संलग्नता विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
४. उपकुलसचिव, घटक महाविद्यालये, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०००३२.
५. उपकुलसचिव, पदव्युत्तर विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
६. उपकुलसचिव, विशेष कक्ष, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
७. उपकुलसचिव, नाव नोंदणी विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ(पूर्व), मुंबई-४०००९८.
८. अधिक्षक, आवक विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
९. अधिक्षक, आवक विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००३२.
१०. उपकुलसचिव, रत्नागिरी उपकेंद्र, पी-६१, MIDC, मिरजोळे, रत्नागिरी-४१५६३९.

**उपरोल्लेखित विभागीय अधिकारी यांना असे कळविण्यात येते की, विद्यार्थी संख्या (Students on Roll) बाबतची माहिती विद्यापीठ विभाग व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांनी भरणे अनिवार्य असून सदर माहिती न भरल्यास त्या विभागाचे/महाविद्यालय/संस्थेच्या विद्यार्थ्यांचे नोंदणी अर्ज (Enrollment Form महाविद्यालयाची संलग्नता (Continuation/Extension)/प्राचार्य/ शिक्षकमान्यता (Approval) परिक्षा अर्ज (Exam.Form) व महाविद्यालये/संस्थांचे कोणतेही पत्रव्यवहार स्विकारू नयेत. तसेच जाहिरात, मसुदा, बिदुंनामावली तपासणी करू नये. असे आदेश मा. संचालक, संचालनालय, उच्चशिक्षण विभाग, पुणे, व मा. कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, यांनी दिलेला असून त्याप्रमाणे प्रत्येक विद्यापीठ विभाग/संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्थेकडून त्याबाबतच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत संबंधितांकडून घेण्यात यावी व त्यानंतर पुढील कार्यालयीन कार्यवाही करावी.**

नोडल अधिकारी,
**(AISHE/MIS Cell)**

Scanned with CamScanner